# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वयेदाखल झालेली तक्रार**

**रामाआ-तक्रार क्र. बीएम- ६३०/२०१८**

**तक्रारकर्ता श्रीमती जयवंती रमेश पाटील व इतर**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सचिव**
श्री. सिध्दीसागर एसआरए सहकारी गृह. संस्था मर्यादित,
९ वा मजला, रुम नं.९०५, वरळी गांव बसडेपोजवळ, वरळी, मुंबई -४०० ०३०.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक**
सहकारी संस्था (मुंबई शहर) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
प्रशासकीय इमारत, अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व) मुंबई -४०० ०५९.

**<u>तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : २०.०६.२०२४</u>**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

आयोगाने यापूर्वी अपील क्र. MHSICMU/२०१७/M/००३५४९ प्रकरणी दि. २४.०९.२०१८ रोजी पुढीलप्रमाणे आदेश पारित केले आहेत :-

"श्री. सिध्दिविनायक एस.आर.ए. गृहनिर्माण संस्थेस असे आदेश देण्यात येत आहेत की, त्यांनी दि. १५.१०.२०१८ पर्यंत या प्रकरणातील सदनिका क्रमांक ६१३ बाबत अपिलार्थींच्या हिताच्या दृष्टीने सदनिका हस्तांतरण होण्याविषयी व सध्या तेथील सभासदाविषयीची माहिती अपिलार्थींना पोस्टाने निशुल्क पाठवावी. या आदेशासह अपील अंशत: मान्य करुन निकाली काढण्यात येत आहे."

उक्त आदेशानंतरही तक्रारकर्त्यांना माहिती प्राप्त झाली नाही या कारणामुळे तक्रारकर्ते यांनी तक्रार क्र. ६३०/२०१८ आयोगाकडे दाखल केली असून सदर तक्रार अर्जावर आज दि. २०.०६.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली आहे.

आजच्या सुनावणीस तक्रारकर्ते व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी तकारकर्त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती दिलेली नाही व मोघमपणे उत्तर दिले त्यामुळे त्यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० (१) व २०(२) प्रमाणे कारवाई करण्यात यावी, अशी मागणी केली.

..२/-

तक्रारकर्त्यांने त्यांचे लेखी म्हणणे आयोगास सादर केले. त्यांचे असे म्हणणे आहे की, राज्य माहिती आयोगाच्या अपील क्रमांक ४९९८/२०१७ दिनांक १९.१२.२०१७ या आदेशाप्रमाणे या संस्थेस माहितीचा अधिकार कायदा लागू होतो. तसेच जन माहिती अधिकारी तथा सचिव, सिध्दीसागर एस.आर.ए. सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.,वरळी यांनी कोणतीही माहिती त्यांना दिली नसल्याने जन माहिती अधिकारी यांचेवरती माहिती अधिकार अधिनियमातील कलम २० (१) व २०(२) अंतर्गत कारवाईची शिफारस करण्यात यावी.

सचिव/अध्यक्ष, सिध्दीसागर एसआरए सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.,वरळी यांनी त्यांचे लेखी म्हणणे आयोगासमोर सादर केले. त्यांचे म्हणणे आहे की, सदर संस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम लागू होत नाही. संस्थेने दिनांक २८.०९.२०१८ रोजी तक्रारकर्त्यास खालीलप्रमाणे कळविले आहे:

अ) आपल्यापैकी कोणही संसथेचे सभासद नाहीत.
ब) आपल्यापैकी कोणाचाही संस्थेच्या सभासदत्वासाठीचा अर्ज संस्थेकडे प्रलंबित नाही.
क) आपल्या पैकी कोणाचाही सर्व सभासदांच्या देखभाल खर्चाशी संबंध नाही.
ड) सदनिका क्रमांक ६१३ मध्ये आपल्या पैकी कोणीही रहिवासी नाही.
ड)सदनिका क्र. ६१३ बाबत कोर्ट कचेरीचे वाद चालू आहे. सबब त्याबाबत काही माहिती देणे संस्थेला योग्य वाटत नाही आणि संस्थेकडून कोणत्याही बाबतच्या माहितीची अपेक्षा करु नये.

संस्थेने त्यांचे निवेदनात नमूद केले आहे की, सदनिका क्रमांक ६१३ विषयी सिटी सिव्हील कोर्ट येथे न्यायालयीन प्रकरण सुरु आहे आणि पुढील तारीख ०५ ऑगष्ट, २०२४ अशी आहे.

राज्य माहिती आयुक्त यांचे द्वितीय अपील क्रमांक ४९९८/२०१७ दिनांक १९.१२.२०१७ वर मा. उच्च न्यायालय ,बॉम्बे यांनी दि. १९ जुलै, २०१८ च्या आदेशाने स्थगिती दिलेली आहे.

या तक्रारीसंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, ज्याअर्थी सदर संस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम लागू होतो असे राज्य माहिती आयोगाच्या आदेशास मा. उच्च न्यायालयाने स्थगिती दिलेली आहे आणि ज्याअर्थी सदर सदनिका विषयी न्यायालयीन प्रकरण सुरु आहे त्याअर्थी आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission * Greater Mumbai

26-6-2024

**मुंबई**
**दिनांक : २५.०६.२०२४**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**